महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१

क्रमांक: १०/एडीएम/अनधिकृतसंस्था/२०२२/ ६०४ दिनांक : 13 JUL 2022

**मान्यता नसलेल्या विद्यापीठ/अनधिकृत संस्थांमधील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका (Diploma, UG Degree, PG Degree, PG Diploma) या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश न घेणेबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य अंतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत, महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, अभिकल्प, प्लॅनिंग, बी.व्होक या पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.फार्मसी, एम.ई./एम.टेक., एम.आर्किटेक्चर, एम.एचएमसीटी, फार्म.डी., फार्म.डी. (Post Baccalaureate), अभिकल्प, प्लॅनिंग या पदव्युत्तर पदवी इत्यादी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत. तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, डी.व्होक या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत. या अभ्यासक्रमांना, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया / कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर / विद्यापीठ अनुदान आयोग / विद्यापीठे / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. **संचालनालयाच्या https://www.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वरील सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था व सदर संस्थेत चालविल्या जाणाऱ्या अधिकृत अभ्यासक्रमांची यादी/ माहिती उपलब्ध आहे.**

येथे असे नमूद करण्यात येते की, **महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्सबंधित किंवा तदाअनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ (सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०) करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आली आहे.** व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशोच्छुक विद्यार्थी वर्ग व पालक यांना सूचित करण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर/विद्यापीठ अनुदान आयोग/ विद्यापीठे / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासन यांचेकडून मान्यता नसल्यास अशा विद्यापीठ /संस्थांमध्ये प्रवेश घेऊ नये.

सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकारच्या तक्रारी या संचालनालयाकडेही येत असतात. या पार्श्वभूमीवर **सर्व प्रवेशोच्छुक विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना सतर्क करण्यात येते की, कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भुलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची मान्यता तपासून घ्यावी तसेच वर नमूद केल्याप्रमाणे संचालनालयाच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित संस्थेचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा.** उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातील संस्था/ विद्यापीठाच्या मान्यतेबाबत या संचालनालयाशी अथवा संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांशी संपर्क साधल्यास त्याबाबतची अधिक माहिती देण्यात येईल.

(डॉ. अभय वाघ)

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई